राज्य शासकीय व जिल्हा परिषद कार्यालयातील
वाहनचालकांना टेरिकॉट गणवेश पुरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-गणवेश-३४९३/प्र. क्र. ४५/९५/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ७ जून, १९९६.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएलओ-१०८२/
१९२९/२९, दिनांक २५ सप्टेंबर, १९९१.

शासन निर्णय :- शासकीय कार्यालयातील वाहन चालकांना गणवेश विहित करण्याचा व गणवेशात कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा तसेच गणवेश खरेदीसाठी [शिलाईसह] दोन वर्षातून एकदा रुपये ८००/- [रुपये आठशे फक्त] एवढी रक्कम देण्याचा निर्णय उपरोक्त दिनांक २५ सप्टेंबर, १९९१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता.

२. शासकीय वाहन चालक व यांत्रिकी संघटना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वाहनचालकांना गणवेशासाठी मिळणारे रुपये ८००/- हे फार अपुरे पडत असल्याने व मध्यंतरीच्या काळात गणवेशाच्या साहित्याच्या दरात भाववाढ झाल्याने त्यात वाढ करुन मिळावी अशी मागणी शासनाकडे केली होती.

३. वरील मागणीचा शासनाने सांगोपांग विचार करुन असा निर्णय घेतला आहे की, दिनांक १ सप्टेंबर, १९९५ पासून प्रत्येक वाहनचालकांना दर दोन वर्षातून एकदा रुपये १०००/- [रुपये एक हजार फक्त] एवढी रक्कम, शासन निर्णय, दिनांक २५ सप्टेंबर, १९९१ मधील तरतुदीस अधिन राहून, गणवेश खरेदीसाठी मंजूर करण्यात यावी. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर रुपये १०००/- एवढ्या रक्कमेचे गणवेश खरेदी करणे व त्या संबंधीच्या पावत्या शासनास सादर करणे वाहन चालकांवर बंधनकारक राहील.

४. सर्वसाधारणपणे शासकीय कार्यालयातील वाहनचालकांचा गणवेश "सफेद" रंगाचा राहील. तथापि सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग वा अन्य विभागांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील वाहनचालकांना त्यांच्या कामाचे स्वरुप लक्षात घेऊन सफेद रंगाव्यतिरिक्त अन्य विशिष्ट रंगाचा गणवेश विहित करण्याबाबतचे आदेश आवश्यकतेनुसार संबंधित विभाग काढतील.

५. वाहनचालकांच्या गणवेशासाठी होणारा खर्च संबंधित विभागानी/कार्यालयांनी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावयाचा आहे.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ [सन १९६२ चा अधिनियम क्रमांक-५] च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही

५८० ८४/६ कार्यालय 5 JUN 1996 सरआवक ६ जि. प. जि. जिल्हाधिकारी

आदेश देत आहे की, हे आदेश जिल्हा परिषदांतील वाहन चालकांच्या गणवेशासाठी लागू राहतील, मात्र त्यासंबंधीचा खर्च संबंधित जिल्हा परिषदांनी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र. क्र. २४६/९५/व्यय-४, दिनांक ४ सप्टेंबर, १९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ शं. वि. नलावडे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति